Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ५, अंक ४७ ] मंगळवार, सप्टेंबर १७, २०१९/भाद्रपद २६, शके १९४१ [पृष्ठे २, किंमत : रुपये १८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १ -अ (असा.), (ना. वि. पु), म. शा. रा., अ. क्र. १५२.

**आयुक्त, महानगरपालिका, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल**

क्रमांक मनपाना-नरवि-कलम-३७-५३१-२०१९.—

ज्याअर्थी, नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(क) अन्वये शासन, अधिसूचना नगर विकास विभाग क्र. टीपीएस-२४९६-२६४३-प्र.क्र.३००(अ)-९७-नवि-९, दिनांक ७ जानेवारी २००० अन्वये भागशः मंजूर झाली असून ती दिनांक १ मार्च २००० पासून अंमलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र.टीपीएस-२४००-१६२८-सी.आर-२००-नवि-९, दिनांक १० सप्टेंबर २००१ अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक २१ सप्टेंबर २००१ पासून अंमलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसूचना क्रमांक टीपीएस-२४०१-८८५-प्र.क्र.-७६-नवि-९, दिनांक २७ फेब्रुवारी २००२ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रा अंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळून उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केले आहे.

आणि ज्याअर्थी, नागपूर शहराच्या मंजूर विकास योजनेतील मौजा धंतोली, नगर भूमापन क्र. १,२,३,४,५,६,७ व ८ या जागेवर मोक्यावर विद्यमान यशवंत स्टेडियम, नोटीफाईड स्लम एरिया, पटवर्धन ग्राऊंड, पत्रकार भवन, शासकीय ग्रंथालय इत्यादींचा समावेश असून या जागेचे नगर भूमापन विभागाचे मालमत्त पत्रकानुसार एकूण क्षेत्रफळ ६७५६४.९० चौ.मी (१६.६९५६ एकर) आहे. या जागेची मालकी महाराष्ट्र शासनाची आहे. तसेच सदर प्रस्तावात मौजा-लेन्ड्रा, नगर भूमापन क्र. २६३ मधील ३३७९.६० चौ.मी. जागा समाविष्ट करण्याचे प्रस्तावित आहे. सदर जागा नागपूर सुधार प्रन्यासच्या मालकीची आहे. मौजा धंतोली व मौजा-लेन्ड्रा येथील वरीलप्रमाणे नगर भूमापन क्रमांकानुसार नमूद क्षेत्रफळ ६७५६४.९० चौ.मी. ३३७९.६० चौ.मी याप्रमाणे एकूण क्षेत्रफळ ७०९४४.५० चौ. मी. (१७.५३०७ एकर) आहे. उक्त जागेचा जमीन वापर बदलवून यशवंत स्टेडीयम सह वाणिज्यीक वापराचे प्रयोजनार्थ आरक्षीत करणेकरीता फेरबदल करण्यासाठी तसेच यशवंत स्टेडीयम लगतचे पंचशील चौक ते मेहाडीया चौक ते मुंजे चौक या विद्यमान १५.०० मी. रुंद रस्त्याचे रूंदीकरण करून सदर रस्ता १८.०० मी रूंद विकास योजना रस्ता म्हणून विकसित करण्याचे प्रयोजनार्थ महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करण्याचे प्रस्तावित असून सदर क्षेत्राकरीता महानगरपालिका, नागपूर हे नियोजन प्राधिकरण आहे.

ज्याअर्थी, मौजा धंतोली, शिट क्र. (४६)११/II, नगर भूमापन क्रमांक १, २, ३, ४, ५, ६, ७ व ८ मधील १६.६९ एकर जागेवरील Recreational Facilities जमीन वापरा अंतर्गत यशवंत स्टेडियम यास्तव नामनिर्देशित असलेल्या जमीनीपैकी तसेच मौजा-लेन्ड्रा, नगर भूमापन क्रमांक २६३ मधील ०.८४ एकर याप्रमाणे एकूण १७.५३ एकर जागेवर वापर बदलवून उक्त जागा यशवंत स्टेडियमसह वाणिज्यिक वापराचे प्रयोजनार्थ आरक्षित करणेकरीता फेरबदल करण्यासाठी तसेच पंचशिल चौक ते मेहाडीया चौक ते मुंजे चौक हा विद्यमान १५.०० मी. रुंद रस्त्याचे रूंदीकरण करून सदर रस्ता १८.०० मी. रुंद विकास योजना रस्ता विकसित करण्याचे प्रयोजनार्थ फेरबदल करण्यास्तव महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६

चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदल करण्याचे ठरविले आहे व यासाठी नागपूर महानगरपालिकेने ठराव क्र. ४१३, अन्वये दिनांक २३-७-२०१९ रोजी पार पडलेल्या सभेत उपरोक्त प्रस्तावित फेरबदलाची कार्यवाही करण्यास मंजुरी प्रदान केलेली आहे.

त्याअर्थी, आता, उपरोक्त फेरबदल दर्शविणारा नागपूर शहराच्या सुधारित विकास योजनेचा भाग नकाशा महानगरपालिकेच्या नगर रचना विभाग, श्री. छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत, बी व सी विंग, तिसरा माळा, महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१ या कार्यालयात कामकाजाचे सर्व दिवशी कार्यालयीन कामकाजाचे वेळेत जनतेच्या निरीक्षणासाठी खुला ठेवण्यात आला आहे. तरी नागरिकांना सूचित करण्यात येते की, ही सूचना प्रकाशित झाल्याचे तारखेपासून एक महिन्याचे कालावधीत विकास योजनेतील उपरोक्त फेरबदलाच्या संबंधात ज्या सूचना किंवा हरकती महानगरपालिकेकडे प्राप्त होतील. त्यावर महानगर पालिकेकडून सुनावणी देण्यात येईल. तद्‌नंतर फेरबदलाचा प्रस्तुत प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात येईल.

नागपूर :
दिनांक १७ सप्टेंबर २०१९.

**अभिजीत बांगर,**
आयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

---

भाग १ -अ (असा.), (ना. वि. पु), म. शा. रा., अ. क्र. १५३.

BY COMMISSIONER, MUNICIPAL CORPORATION

**Modification under Section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966**

No. NMC-TPD-Act-37-531-2019.—

Whereas, the Revised Development Plan of Nagpur City prepared under the provisions of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, Section 31(*1*) has been partially sanctioned by the Government *vide* Urban Development Department Notification No. TPS-2496-2643-CR-300(a)-97-UD-9, dated 7th January 2000 and came into force from 1st March 2000. Excluded part of Development Plan has been sanctioned *vide* Government Notification No. TPS-2400-1628-CR-200-2000-UD-9, dated 10th September 2001 and came into force from dated 21$^{st}$ September 2001. Also Nagpur Municipal Corporation has been declared as the 'Planning Authority' for Nagpur City except the areas covered under seven scheme *vide* Govt. Notification No. TPS-2401-855-CR-76-UD-9, dated 27th February 2002.

"In the sanctioned Development Plan of Nagpur the land bearing Mouza- Dhantoli, CTS No. 1, 2, 3, 4, 5, 6, 7 & 8 having existing Yashwant Stadium, Notified slum Area, Patwardhan Ground, Patrakar Bhavan, Govt. Library, etc. According to City Survey document total area of the said land is 67564.90 m$^2$ (16.6956 acre). The ownership of the said land is of Govt. of Maharashtra. Also land bearing Mouza-Lendra CTS No. 263 having area-3379.60 m$^2$ is supposed to be included in the said proposal. The ownership of said land is of Nagpur Improvement Trust. The total land for the said proposal of Mouza-Dhantoli & Mouza-Lendra according to above CTS Nos. is (67564.90 m$^2$ + 3379.60m$^2$) = 70944.50m$^2$ (17.5307 Area). This area to be proposed and designated for Yashwant Stadium with commercial use. Alongwith the 15.00 mt. wise road to be proposed 18.00 mt. wide D.P. road from Panchsheel Square to Mehadia Square to Munje Square" as per Section 37(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 and the Planning Authority for the said land is Nagpur Municipal Corporation.

And, whereas, as per Section 37(*1*) of the Maharashtra regional and Town Planning Act, 1966 Nagpur Municipal Corporation, has decided to modify the land use for land bearing Mouza-Dhantoli, CTS No. 1, 2, 3, 4, 5, 6, 7 & 8 having area admeasuring 16.69 acre land nominated as Yashwant Stadium under Recreational Facilities and area admeasuring 0.84 acre from Mouza-Lendra CTS No. 26 *i.e.* total area admeasuring 17.53 acre land, Nagpur Municipal Corporation has decided to modify the land use of the above said land as Yashwant Statium with Commercial use. Alongwith the 15.00 mt. wide road to be proposed 18.00 mt. wide D. P. road from Panchsheel Square to Mehadia Square to Munje Square. The Nagpur Municipal Corporation has passed the resolution No. 413, dt. 23-07-2019 has to make the aforesaid proposed modification.

Now, therefore, the part plan of Development Plan of Nagpur City showing the aforesaid proposed modification are kept open at the office of the Town Planning Deptt. of Nagpur Municipal Corporation for inspection by public during office hours on all working days. The suggestions and objections which may be received to Municipal Corporation in respect of the said modification to the Development Plan within a period of one month from the date of publication of this notice, will be heard by the Municipal Commissioner before submitting the said modification proposal, to the State Government for sanction.

Nagpur :
Dated the 17th September 2019.

ABHIJIT BANGAR,
Commissioner,
Nagpur Municipal Corporation, Nagpur.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT PRESS, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.